# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ४२ वा ❑ भारतीय सौर दिनांक ३० फाल्गुन शके १९४७, शनिवार दि.२१ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## राजकारणी आणि भोंदूबाबांचे संबंध पुन्हा एकदा चव्हाट्यावर?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

स्वयंघोषित बाबांची संख्या भारतात कमी नाही. स्वतःला ईश्वरीय अवतार समजणारे व लोकांवर उपचार करणारे स्वतःमध्ये अद्भुत शक्ती आहे, असे चमत्कार करून दाखविणाऱ्यांची संख्या भारतात मोठी आहे. विशेष म्हणजे या भोंदू बाबां कडे आशीर्वाद घ्यायला जाणारे असंख्य राजकारणी नेते आहेत. ज्यामुळे या भोंदूगिरी बाबांची चलती आहे. राजकारणातील बडे नेते, मोठे अधिकारी या भोंदू बाबांकडे जातात, त्यांचा आशीर्वाद घेतात त्यांचे पाय पडतात एक प्रकारे या भोंदू बाबांचे राजकीयकरण मोठ्या प्रमाणात होत आहेत. राजकीय नेत्यांच्या आशीर्वादामुळे भोंदू बाबूचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अनेक राजकारणी भोंदू बाबांच्या नादी लागतात.अलीकडेच नाशिकमधील अशोक खरात उर्फ कॅप्टन या भोंदू बाबाच्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या घटनेने राजकारणी आणि अशा भोंदू बाबांचे संबंध पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

अनेक राजकारणी आपल्या भविष्याबद्दल, निवडणुकीतील विजयाबद्दल किंवा मंत्रिपद मिळण्याबाबत साशंक असतात. या असुरक्षिततेपोटी ते चमत्कारी उपाय शोधण्यासाठी ज्योतिषी किंवा भोंदू बाबांच्या आश्रयाला जातात.

भोंदू बाबांकडे किंवा महाराजांकडे मोठा भक्तवर्ग असतो. या भक्तवर्गाला आपल्याकडे वळवण्यासाठी किंवा निवडणुकीत मते मिळवण्यासाठी राजकारणी अशा बाबांच्या चरणी नतमस्तक होताना दिसतात.

जेव्हा लोकप्रतिनिधी अशा भोंदू बाबांच्या पाद्य पूजेला किंवा कार्यक्रमांना हजेरी लावतात, तेव्हा सामान्य जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होतो.याचा अर्थ असा की लोकांना अंधश्रद्धेकडे वळायला राजकारणी नेते कारणीभूत ठरत आहेत. एखादा सर्वसाधारण व्यक्ती स्वतःला , साधू संत म्हणून घेतो.आणि राजकारणी,नेते त्यांच्या दर्शनाला जातात.सर्वसाधारण लोक याला बळी पडतात.

नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात या हाय-प्रोफाईल व्यक्तीला महिलांचे शोषण केल्याप्रकरणी नुकतीच अटक करण्यात आली आहे. खरात हा स्वतःला अंकशास्त्रज्ञ आणि ज्योतिष म्हणवून घेत असे.

खरात आपल्याकडे दैवी शक्ती असल्याचा दावा करून महिलांचे संमोहन करत असे.पीडित महिलांना आपल्या केबिनमध्ये बोलावून, गुंगीचे औषध देऊन त्यांच्यावर बलात्कार केल्याचे आणि अश्लील चाळे केल्याचे आरोप त्याच्यावर आहेत.

तपासादरम्यान पोलिसांना त्याच्याकडे ५८ पॉर्न व्हिडिओ आणि आक्षेपार्ह साहित्य सापडल्याची माहिती समोर आली आहे.

खरात हा नाशिकमधील सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष होता. तो लोकांचे भविष्य सांगण्याच्या नावाखाली महिलांना भुलवून अत्याचार करत असे. पीडित महिलांना गढूळ पाणी (गुंगीचे औषध) पाजून त्यांच्यावर अत्याचार केले जायचे आणि त्याचे व्हिडिओ बनवून ब्लॅकमेल केले जात होते.पोलिसांनी त्याच्या फार्म हाऊसवर छापा टाकून जप्त केलेल्या पेन ड्राइव्हमध्ये ५८ आक्षेपार्ह व्हिडिओ सापडले आहेत

खरात याला काही राजकीय व्यक्तींचा पाठिंबा असल्याचा आरोप अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केला आहे, तसेच त्याचे अनेक बड्या नेत्यांसोबतचे फोटो व्हायरल झाले आहेत. शिर्डी, सिन्नर आणि कोपरगावात खरात आणि त्याच्या पत्नीच्या नावे चार एकर भुखंडासह मोठी मालमत्ता असल्याचे तपासात समोर आले आहे

राजकीय वर्तुळात आणि सेलिब्रिटींमध्ये त्याचे उठणे-बसणे होते. अनेक बडे नेते आणि प्रसिद्ध व्यक्ती त्याचे मार्गदर्शन घेण्यासाठी येत असत, ज्यामुळे या प्रकरणाने मोठी खळबळ उडवून दिली आहे या प्रकरणामुळे राजकीय वातावरणही तापले असून, विविध पक्षांच्या नेत्यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत आणि महिला आयोगाकडे कडक कारवाईची मागणी केली आहे. हे उल्लेखनीय आहे की या स्वयंघोषित ज्योतिषाकडे अनेक राजकीय नेत्यांचा राबता होता. केसरकर, तटकरे चाकणकर अशी काही राजकीय भक्तांची नावे समोर आली आहे.

अनेक राजकीय नेत्यांनी या ज्योतिषाच्या सांगण्यावर वेगवेगळ्या पूजा करणे, स्वतःच्या हाताची करंगळी कापून घेणे असे अघोरी उद्योगसुद्धा केल्याचे लोक चर्चा करत आहेत. विशेष यापूर्वी सुद्धा अशोक खरात याच्यावर जेव्हा लैंगिक शोषणाचे आरोप एका संस्थेने केले. तेव्हा चाकणकर यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत संबंधित संस्थेकडून दबाव आणून माफीनामा घेतला होता. विशेष; खरात यांनी स्थापन केलेल्या संस्थेवर रूपाली चाकणकर संचालक म्हणून काम करतात. खरात याच्या घरच्या लग्न कार्यामध्ये चाकणकर जातीने आवभगत करताना बघून अनेकांना आश्चर्य वाटले होते. आता आम्हाला शंका नव्हे भीती आहे, पुन्हा एकदा महिला आयोगासारख्या अत्यंत जबाबदार पदाचा दुरुपयोग करत रूपाली चाकणकर यांनी अशा लिंगपिसाट माणसाला मदत केली तर याची जबाबदारी कोण घेणार ?

महाराष्ट्र हा शाहू-फुले-आंबेडकरांचा आणि अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचा पुरस्कार करणारा प्रदेश आहे. तरीही राजकारणी अशा भोंदूगिरीला खतपाणी घालत असल्याने राज्याच्या प्रतिमेला तडा जात असल्याची टीका होत आहे.

राजकारण्यांनी अशा भोंदूगिरीपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे अपेक्षित आहे, परंतु दुर्दैवाने सत्तेच्या स्पर्धेत हे चित्र सध्या विपरित दिसत आहे.

# हिंदू संमेलनात माणसांचा सेतू बांधण्याचे आवाहन

## कर्वेनगरमध्ये हिंदू संमेलन उत्साहात; शिवमुद्रा आणि पोवाड्याने भरले अंगावर शहारे

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - ''प्रभू श्रीरामांनी गुह नावाडी, शबरी माता आणि वानरसेनेला सोबत घेऊन माणसांचा सेतू बांधला आणि सामाजिक समरसतेचा आदर्श घालून दिला. तोच वारसा छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींना भगव्या ध्वजाखाली एकत्र आणून पुढे चालवला. आजच्या काळातही विखुरलेल्या हिंदू समाजाला संघटित करून सनातन धर्माचे आचरण करणे हीच खरी राष्ट्रभक्ती आहे,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. चारुदत्तबुवा आफळे यांनी केले.

कर्वेनगर येथील भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ई-लर्निंग स्कूलच्या मैदानावर सकल हिंदू समाज (वेदांत-शाहू वस्ती) च्या वतीने आयोजित भव्य हिंदू संमेलनात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर



मुख्य वक्ते हेमंत हरहरे, प्रणिता यतनाळकर, संमेलनाचे अध्यक्ष कल्याण दाते व हर्षल शेवाळे उपस्थित होते. प्रमुख वक्ते हेमंत हरहरे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकी वाटचालीचा आढावा घेतला. ते म्हणाले, ''सामान्य माणसांकडून असामान्य कर्तृत्व करवून घेणारी माणसे निर्माण करणे, हे संघाच्या कार्याचे गमक आहे. गेल्या १०० वर्षांत पाच सरसंघचालक आणि स्वयंसेवकांच्या अनेक पिढ्या बदलल्या, तरीही संघ अधिक जोमाने वाढत आहे, कारण हिंदू समाजाचा या संघटनेवर अढळ विश्वास आहे.''

प्रणिता यतनाळकर यांनी पंचपरिवर्तन या विषयावर मार्गदर्शन करताना कौटुंबिक पातळीपासून ते वैश्विक पातळीपर्यंत सामाजिक समरसता आणि पर्यावरण रक्षण कसे आचरता येईल, हे विविध उदाहरणांतून पटवून दिले.

या संमेलनात वात्सल्य पाळणाघरातील लहान मुलांनी खणखणीत आवाजात दिलेली शिवरायांची ललकारी आणि शिवमुद्रा उपस्थितांच्या अंगावर शहारे आणणारी ठरली. गुरु रसिका गुमास्ते यांच्या नृत्यालयातील शिष्यांनी कवी वसंत बापट यांच्या पंचनद्यांवरील कवितेवर आधारित संस्कृती आणि परंपरेचा जिवंत आलेख नृत्यातून उभा केला. तसेच श्री. अथर्व कुलकर्णी यांनी ग. दि. माडगूळकर लिखित संभाजी राजांचा पोवाडा अत्यंत प्रभावीपणे सादर केला. औरंगजेबाचे क्रौर्य आणि शंभूराजांचे अजोड बलिदान त्यांनी अभिनय आणि गायनातून मूर्तिमंत उभे केले.

या कार्यक्रमाला राजाभाऊ बराटे, सुशील मेंगडे, तेजश्रीताई पवळे, रेश्मा ताई बराटे यांसह कर्वेनगर परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. अर्चना देशमुख व डॉ. स्वाती पन्हाळे यांनी केले.

# मराठी नवकाव्याचे जनक बा. सी. मर्ढेकर

**ज्योतिर्मय साहित्य**

स्मृतिदिनानिमित्त एक प्रयत्न.

प्रेमाचें लव्हाळे,<br>
सौंदर्य नव्हाळे,<br>
शोधू?<br>
आसपास<br>
यंत्रांतून आग;<br>
गोळ्यांचे पराग;<br>
विमानाचे हल्ले,<br>
बेचिराख जिल्हे;<br>
रक्ताचीं थारोळीं;<br>
अपंग आरोळी;<br>
बेभानलें मन<br>
रोखतां संगीन;<br>
विटली ही काया.<br>
देशावर माया<br>
कुणाच्या ? कोणाची ?<br>
पडत्या फळाची<br>
आज्ञा होतां वीर<br>
हातीं घेई शीर<br>
कुणाचें ? कशाला ? -<br>
भाकरी पोटाला !!<br>
आम्हा भाग्यवंतां<br>
क्षमस्व अहंता;<br>
आमुचें मरण<br>
-आम्हीच जळण-<br>
पाहिलें या डोळा !<br>
विश्वंभर भोळा<br>
सडवी पाचोळा<br>
फुलविण्या ज्वाळा ।<br>
पृथ्वीची तिरडी<br>
(एरव्हीं परडी<br>
फुलांनी भरली !)<br>
जळो देवा, भली !!




कवी बा. सी. मर्ढेकर यांची ही कविता युद्ध, हिंसा आणि हरवत चाललेल्या माणुसकीचं अत्यंत तीव्र चित्र उभं करते. कवी सुरुवातीलाच ''प्रेम'' आणि ''सौंदर्य'' शोधण्याची इच्छा व्यक्त करतात, पण लगेचच वास्तव समोर येतं. यंत्रांतून निघणारी आग, गोळ्यांचा वर्षाव, विमानांचे हल्ले आणि बेचिराख झालेले जिल्हे. या प्रतिमा फक्त बाह्य विनाश दाखवत नाहीत, तर त्या माणसाच्या अंतर्मनात निर्माण झालेल्या भीती, अस्वस्थता आणि वेदनाही दाखवतात. ''रक्ताची थारोळी'' आणि ''अपंग आरोळी'' या ओळींमधून युद्धाची भीषणता आणि निरपराध लोकांची अवस्था अत्यंत प्रभावीपणे व्यक्त होते.

कवी पुढे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न विचारतात, देशावर प्रेम नेमकं कुणाचं आणि कोणासाठी? सैनिक प्राण देतात, पण त्यामागचं कारण काय? ''भाकरी पोटाला'' या ओळीतून तो युद्धामागील कटू वास्तव उघड करतात. जगण्यासाठी, उपजीविकेसाठी माणूस या हिंसेत ओढला जातो. इथे कवीला युद्धातील शौर्यापेक्षा त्यामागची असहाय्यता आणि विडंबन अधिक जाणवतं.

कवितेत कवी स्वतःलाही या परिस्थितीपासून वेगळं ठेवत नाहीत.

''आम्हा भाग्यवंतां क्षमस्व अहंता'' म्हणताना ते आपल्या निष्क्रियतेची जाणीव व्यक्त करतात. आपण सुरक्षित आहोत असं वाटत असलं, तरी प्रत्यक्षात आपणही या विनाशाच्या प्रक्रियेचा एक भाग आहोत. ''आम्हीच जळण'' या ओळीतून ते सांगतात की, हा नाश शेवटी सर्वांना स्पर्श करणार आहे.



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

शेवटच्या भागात ''पृथ्वीची तिरडी'' हे रूपक अत्यंत प्रभावी आहे. जी पृथ्वी पूर्वी फुलांनी भरलेली, जीवनाने ओथंबलेली होती, ती आता जणू एखाद्या मृतदेहासारखी जळत आहे. इथे कवीचा वेदनादायक निष्कर्ष दिसतो. मानवाच्या हिंसाचारामुळे संपूर्ण पृथ्वीचं अस्तित्व धोक्यात आलं आहे.

एकंदरीत, ही कविता युद्धाच्या भीषणतेवर आणि माणुसकीच्या ऱ्हासावर तीव्र भाष्य करते. ती वाचकाला अस्वस्थ करते, प्रश्न विचारायला भाग पाडते आणि प्रेम, शांतता व मानवी मूल्यांची गरज अधोरेखित करते.

कविता जरी जुन्या काळात लिहिलेली असली तरी तिचा आशय आजच्या परिस्थितीत अगदी तसाच लागू पडतो. आज जगात सुरू असलेल्या अनेक संघर्षांकडे पाहिलं जसं रशिया - युक्रेन युद्ध किंवा इस्त्रायल - हामास युद्ध तर कवितेतील प्रत्येक प्रतिमा जिवंत होताना दिसते.

कवितेत ''यंत्रांतून आग, गोळ्यांचे पराग, विमानांचे हल्ले'' असं वर्णन आहे. आजच्या युद्धातही तंत्रज्ञान अधिक प्रगत झालं असलं तरी स्वरूप तेच आहे मिसाईल हल्ले, ड्रोन, बॉम्बस्फोट. त्यामुळे ''बेचिराख जिल्हे'' ही ओळ आजच्या उद्ध्वस्त शहरांना अगदी अचूक लागू पडते. अनेक ठिकाणी सामान्य नागरिकांचे जीव जात आहेत, घरे उद्ध्वस्त होत आहेत हेच ''रक्ताची थारोळी, अपंग आरोळी'' या ओळींमधून कवीने आधीच दाखवलं आहे.

कवीने विचारलेला प्रश्न ''देशावर माया कुणाच्या? कोणाची?'' आजही तितकाच महत्त्वाचा आहे. युद्धामध्ये निर्णय काही मोजक्या सत्ताधाऱ्यांचे असतात, पण त्याची किंमत सामान्य माणूस चुकवतो. सैनिक लढतात, प्राण देतात, पण ''भाकरी पोटाला'' ही ओळ आजही वास्तव आहे. अनेक जण नोकरी, कर्तव्य किंवा गरज म्हणून युद्धात उतरतात.

''आम्हीच जळण'' ही ओळ तर आजच्या काळात अधिक तीव्र वाटते. कारण युद्धाचा परिणाम फक्त युद्धभूमीपुरता मर्यादित राहत नाही त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होतात:

महागाई वाढते, अन्नटंचाई निर्माण होते,

स्थलांतरितांची समस्या वाढते

म्हणजेच, आपण थेट युद्धात नसूनही त्याचे परिणाम आपण सगळे भोगतो.

शेवटचं ''पृथ्वीची तिरडी'' हे रूपक तर आजच्या काळात अधिक अर्थपूर्ण आहे. सततच्या युद्धांमुळे आणि हिंसाचारामुळे संपूर्ण जगाचंच संतुलन बिघडत चाललं आहे. जणू पृथ्वीच हळूहळू नष्ट होत आहे.

एकंदरीत, ही कविता आपल्याला सांगते की काळ बदलला, तंत्रज्ञान बदललं, पण युद्धाचं स्वरूप आणि त्यातून होणारा विनाश अजूनही तसाच आहे

आणि सर्वात मोठं सत्य म्हणजे युद्धात कुणीच खऱ्या अर्थाने जिंकत नाही, सगळेच काहीतरी गमावतात.

ही कविता आणि हे युद्ध दोन्ही एकच गोष्ट सांगतात की युद्धात सर्वांत मोठं नुकसान माणुसकीचं होतं

आणि शेवटी सामान्य माणूसच सर्वांत जास्त भरडला जातो.

कवीवर्य बा. सी. मर्ढेकरांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन

***





ज्योतिर्मय

गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.


शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.

सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.

त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




## जात्यावरच्या ओव्या......

मन कुंभाराचा आवा
नानापरीचे मडके
दह्यादुधाला चालले
देले फेकून फुटके ||५५४||

मन फुला आधी काटे
कसे उगले कोण जाणे?
फुले, फुलवाया इथे
गाऊ देवाजीचे गाणे ||५५५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ९




ज्योतिर्मय साहित्य

पुढीलांचे म्हणजे दुसऱ्याचे द्रव्य किंवा पैसा नको. ते कोणत्याही प्रकारे घेणे म्हणजे एक प्रकारची चोरीच आहे. मग पैसा मिळवायचाच नाही का ? प्रापंचिक माणसाला तर पैसा आवश्यकच असतो. अगदी साधू संन्यासी यांना देखील अन्न, वस्त्र, निवारा यांची आवश्यकता असतेच. मग पैसा कसा मिळवावा ? याचे उत्तर संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे जोडोनिया धन उत्तम व्यवहारे हे आहे. अशा पद्धतीने पैसा मिळवला तर तो धर्माला मान्य आहे. सरळमार्गी राहून पैसा मिळवता येत नाही अशा प्रकारची साधारण समजूत आहे. परंतु कष्टाने आणि सरळ मार्गाने पैसा मिळवून श्रीमंत झालेल्यांची अनेक उदाहरणे समाजात आहेत. परंतु त्याकडे आपले फारसे लक्ष जात नाही. पण अशी उदाहरणे आदर्श म्हणून समाजासमोर ठेवली गेली पाहिजेत.



असे म्हणतात की माणसाच्या गरजा पूर्ण करता येतात परंतु हाव पूर्ण करता येत नाही. म्हणून गरजेपुरते असले की माणसाने समाधानी असावे. परंतु तसे होत नाही. म्हणून आपल्यापेक्षा खालच्या स्तरावर असलेल्या व्यक्तीकडे पहावे असे म्हटले जाते. कारमध्ये फिरणाऱ्या माणसाने मोटरसायकलवर फिरणाऱ्या माणसाकडे पाहून आपण त्यापेक्षा भाग्यवान आहोत असे समजून समाधान मानावे. मोटरसायकलवाल्याने सायकल चालवणाऱ्याकडे, सायकलवर असणाऱ्याने पायी चालणाऱ्याकडे लक्ष द्यावे म्हणजे आपण किती भाग्यवान आहोत हे लक्षात येईल. परंतु असे होत नाही. आपण नेहमी उलटच करत असतो. श्रीमंत अतिश्रीमंताकडे पाहत असतो आणि स्वतःला दुःखी करून घेत असतो.

अतिस्वार्थ बुद्धीमुळे आपल्याला अधिक हवे असे वाटत असते आणि मग ते कोणत्याही मार्गाने मिळवण्यात काही गैर वाटत नाही. परंतु असे करत असताना आपण पापकर्मांचाच संचय करत जातो. गैरमार्गाने पैसा कमावणारे लोक समाजात सुखाने जगताना दिसतात. ते पाहून आपणही तसे करावे असे वाटणे साहजिक असते. परंतु कर्माच्या सिद्धांतानुसार अशा लोकांना देखील आपल्या पापाचा हिशेब द्यावाच लागतो. ज्यांच्यावर अनेक घोटाळ्यांचे आरोप आहेत असे भ्रष्ट नेते एखाद्यावेळी न्यायालयातून निर्दोष सुटतीलाही परंतु नियती हे असे न्यायालय आहे की जिथे आपल्या कर्मांचा योग्य तो हिशेब होतोच. तिथे कोणाचीही सुटका नाही. अधिकाधिक पैसा कमावण्याचा हव्यास लागतो तेव्हा अनेक प्रकारच्या चिंता, दडपण, स्पर्धा यासारख्या गोष्टींना सामोरे जावे लागते. त्यातूनच मग दडपण, निद्रानाश, अपचन, रक्तदाब, हृदयविकार यासारख्या अनेक विकारांना निमंत्रण मिळते. त्यामानाने सरळ मार्गाने वागणारा माणूस खाऊन पिऊन सुखी आणि समाधानी असतो. पैशाची, संपत्तीची आणि सत्तेची हाव सुटलेल्या माणसाला जेव्हा त्याच्या मनासारखे होत नाही तेव्हा मोठ्या दुःखाला सामोरे जावे लागते. धनवृद्धीसोबत जर चिंतावृद्धी होत असेल तर काय उपयोग ?समर्थांचा इशारा स्पष्ट आहे

**(क्रमशः)**






दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## श्रवणनाम निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

हरिदासाला किर्तन आवडते. कोणाला स्नानसंध्या आवडते,

कर्म प्रधान माणसाला कर्म विधी आवडतात. प्रेमळ माणसाला दया आवडते. स्वार्थी माणसाला स्वार्थ आवडतो.चतुराला हुशारी आवडते. तर व्यवहारी माणसाला प्रत्येक गोष्टीत चिक्कीसा आवडते.

भक्त मुर्ति ध्यान लावून बसतो.


गाणं गाणारा तालांचे ज्ञान आवडीने पहातो.तर गाणारा जर. अती अभ्यासु असेल तर तो ताना आलाप, मींड, खटके यांचा अभ्यास करून आपल्या गायन कलेत पारंगत होतो. योगाभ्यास करणाऱ्या लोकांना शरिरचनेच्या ज्ञानाची आवड असते. तत्वज्ञानी माणसाला तत्वज्ञान ग्रंथाची आवड असते. शृंगार प्रिय माणसाला काम शास्त्राची आवड असते. टवाळाला विनोद आवडतो.

कुणाला रसाळ वाणी प्राप्त झाली असेल तर तो रसाळ वर्णन करून समोरच्याला आनंद देतो. कुणाला पाल्हाळ बडबड आवडते.

ज्याला राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावे वाटते तो शुरकथांचा अभ्यास करतो ते लिहितो व शौर्य त्याग केला सेवा यांची महती जगाला सांगतो.

ज्याला आत्मकल्याण साधायचे आहे तो तो सातत्याने सात्विकता जपत असतो. साधकाने ते ज्ञान जपावे वाढवावे. शाश्वतता ही संयम शिकवते तर शाश्वतता ही अधोगतीकडे नेते. ग्रंथ वाचनाने विवेक सतत जागृत ठेवावा. त्याच्या जोरावर तो आत्मानात्म विवेकावर भर देत रहातो. स्वतः चे अन् समाजाचे कल्याण करतो. म्हणून संतसहवासाचा नेहमी अट्टाहास धरावा संत साहित्याचे वाचन करावे व ते सतत कृतीत उतरावे.

समास नववा समास जय जय रघुवीर समर्थ ***



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामात असणे म्हणजेच शुद्धीवर असणे

ज्योतिर्मय साहित्य

दारुड्यांच्या मेळाव्यात सारेच दारूच्या धुंदीत असतात. पण त्यांतल्या एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारुडे त्याला 'हा शुद्धीवर नाही' असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुद्धीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे, आपण सर्वजण विषयांत दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण 'हा शुद्धीवर नाही' असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, 'नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही ' अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले, की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही, कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव असणारच; त्याचप्रमाणे नाम, संत आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती आणि भगवंत असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे 'रामनाम.' हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही.

भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नाम-नदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दुःखे कस्पटाप्रमाणे वाटतील.

तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंडीत जाण्याची जरूरीच नाही. तेच तुम्हांला धुंडीत येतील.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे.....

एखाद्या खुनी माणसाने चाकू खुपसून एखाद्याला जखमी केले असे समजा. या खुनी माणसाने त्या व्यक्तीचे पोट फाडले आहे व त्या जखमी व्यक्तीस डॉक्टर ही पोट फाडतो व ते शिवून बरे करतो. खुन्यानेही पोटच फाडले पण डॉक्टर हा त्याचे जीव वाचायचे कर्म करतो. या दोघांचे कर्म एक असले तरी फळ दोन आहेत.

एक स्त्री पुत्रास व पतीस आलिंगन देते पण पुत्रास आलिंगन देताना वात्सल्य आहे तर पतीस देताना समर्पण हा भाव आहे. या सूक्ष्मतेने कर्माचे फळ भोगावे लागते. केलेले कर्म तेची भोगावे लागते.

एक वृद्ध वडील मुला जवळ रहात होते. मुलगा त्यांना कंटाळला. तो त्यांचेकडे जुजबी लक्ष द्यायचा. मुलगा त्यालाही कंटाळला. एके दिवशी मुलगा म्हणाला, मी बापाला वृद्धाश्रमात नेऊन ठेवतो. त्याने त्या प्रमाणे त्याने तिथे वडीलांना नेऊन सोडून आला. काय असते ? मांजर व वृद्ध माणसात एक समान गुण आहे. ते पलटून येतात. तसा हा म्हातारा परत आला.

हा ही उपाय जमला नाही. मुलगा म्हणे आता याला काशी यात्रेला नेतो व गंगेत नेऊन ढकलतो. मुलगा बापास म्हणाला चला काशीला जाऊ.. बाप म्हणाला हा रोज शिव्या घालतो, हा आज कसा तयार झाला? मुलाने हट्टाने वडिलांना काशी येथे नेले. ते दोघे तिथे रात्री पोहोचले. मुलगा म्हणाला दीवसा याला नदीत ढकलले तर लोक पाहतील. म्हणून तो बापास म्हणाला येथील एक नियम आहे इथे आल्या आल्या गंगेवर स्नान करावे लागते. मध्य रात्रीच त्याने बापास नदीवर नेले. बाप म्हणे मी घाटावर बसून आंघोळ करतो. तो म्हणे तिर्थ स्नानाचे कांही नियम असतात. तीर्थाचे स्नान कमरे इतक्या पाण्यात उतरूनच करावे लागते. प्रथम नदीला वंदन करावे. पाण्यात प्रथम उजवे पाऊल टाकावे. पाण्यात पाय उचलून टाकू नये.स्नान करताना काष्टा घातलेला असावा.

क्रमश :....



आरोग्य संजीवनी

## पोहणे एक व्यायाम

ज्योतिर्मय साहित्य

पोहणे हा केवळ एक विरंगुळा नसून, तो आरोग्यासाठी सर्वात प्रभावी आणि सर्वांगीण व्यायाम (- ) मानला जातो. लहानांपासून थोरांपर्यंत कोणीही हा व्यायाम करू शकते.

पोहण्याचे मुख्य फायदे खालीलप्रमाणे आहेत:

१. संपूर्ण शरीराचा व्यायाम

पोहताना शरीरातील जवळपास सर्वच स्नायूंचा वापर होतो. हात, पाय, पाठ आणि पोटाचे स्नायू एकाच वेळी कार्यरत असल्याने शरीराला चांगला आकार येतो आणि ताकद वाढते.

*२. हृदयाचे आरोग्य पोहण्यामुळे हृदयाची गती वाढते आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता सुधारते. नियमित पोहण्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

३. सांधेदुखीवर गुणकारी

जमिनीवर व्यायाम करताना सांध्यांवर ताण येऊ शकतो, पण पाण्यात शरीराचे वजन हलके वाटते. त्यामुळे ज्यांना गुडघेदुखी किंवा सांधेदुखी आहे, त्यांच्यासाठी पोहणे हा सर्वोत्तम व्यायाम आहे.

४. वजन कमी करण्यासाठी प्रभावी

एका तासाच्या पोहण्यामुळे भरपूर कॅलरी जाळल्या जातात. धावण्यापेक्षाही पोहण्यातून जास्त ऊर्जा खर्च होऊ शकते, ज्यामुळे वजन वेगाने कमी होण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

५. मानसिक आरोग्य आणि ताणतणाव मुक्ती*

पाण्याचा

स्पर्श मनाला शांत करतो. पोहण्यामुळे शरीरात एंड्रॉर्फिन नावाचे संप्रेरक तयार होते, ज्यामुळे तणाव कमी होऊन मन प्रसन्न राहते आणि झोपही चांगली लागते.

पोहताना घ्यायची काळजी:

वॉर्म-अप: पाण्यात उतरण्यापूर्वी हलके व्यायाम करा.

सुरक्षा: जर तुम्ही शिकत असाल, तर नेहमी प्रशिक्षकाच्या () मार्गदर्शनाखालीच पोहा.

हायड्रेशन: पोहताना घाम येत नसल्याचे वाटले तरी शरीर पाणी गमावत असते, त्यामुळे भरपूर पाणी प्या.

वेळ: सुरुवातीला १५-२० मिनिटे पोहा आणि हळूहळू वेळ वाढवा.

## आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495



### वेताळ कथा ८ (वेताळ पंचविंशती)



एका नगरात एक व्यापारी राहत होता. तो खूप श्रीमंत होता, पण त्याला अजून संपत्ती हवी होती.
एके दिवशी त्याला एक साधू भेटला. साधूने त्याला एक अद्भुत रत्न दिले आणि सांगितले "हे रत्न तुला हवे ते देईल, पण लोभ करू नकोस."
व्यापाऱ्याने सुरुवातीला थोडे धन मागितले. त्याला ते मिळाले. हळूहळू त्याचा लोभ वाढू लागला.
त्याने अधिक संपत्ती मागितली. मग अजून.
शेवटी त्याने इतके मागितले की तो स्वतःच त्या संपत्तीच्या ओझ्याखाली दबला. त्याला जाणवले की त्याचा लोभच त्याच्या दुःखाचे कारण आहे.
शेवटी त्याने ते रत्न परत केले आणि साधे जीवन स्वीकारले.
वेताळाने विचारले - तो व्यापारी मूर्ख होता की शहाणा?
राजा विक्रम उत्तर देतो - "जो आपल्या चुका ओळखतो आणि बदलतो, तोच खरा शहाणा."
असे राजाचे उत्तर ऐकले व वेताळ पुन्हा झाडावर लटकला
या कथेवरुन आपणही चिंतन केले पाहिजे की..
मला जे आहे त्यात समाधान आहे का? की मी सतत अधिक हवे असे वाटते?
या कथेत "लोभ आणि समाधान यांचा संघर्ष" दिसतो.
इच्छा : काहीतरी मिळवण्याची आकांक्षा
लोभ : अधिकाधिक मिळवण्याची इच्छा
असंतोष : जे आहे त्यात समाधान नसणे
जाणीव : लोभाचे परिणाम दिसू लागणे
समाधान : जे आहे त्यात आनंद मानणे
असे चिंतन करून आपल्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडावे असा या कथांमागचा उद्देश आहे.
थोडक्यात : "समाधानातच खरे सुख आहे."
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे नाविन्यपूर्ण गुढी पाडवा





**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : दरवर्षी प्रमाणे कुलस्वामिनी प्रतिष्ठान (वर्ष ११ वे) तर्फे हिंदु नववर्ष निमित्त दुर्गा माताची ९ रूप असलेल्या, नवरंगाची ९ गुढीची पुजा गुढी पाडवा मुहुर्तावर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व पूजा करून करण्यात आली. या उपक्रमाची प्रस्तावना विलास कोरडे यांनी करून हिंदु संस्कृती व जनजागृतीसाठी सामुहिक सण करणे गरजेचे आहे असे सांगितले व दरवर्षी असाच भव्य सोहळा करण्याचा संकल्पही केला.

जवळपास ४०० महिला व मुली काठपदर साडी अशा पारंपारिक वेशात तसेच नागरिक उपस्थित होते. उपस्थित महिला व नागरिकांना कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे फेटे घालून सत्कार व भेट वस्तू देण्यात आली.

१२० भगवान बाबा आश्रमच्या अनाथ मुली उपस्थित होत्या. त्यांचा विशेष सत्कार व पाडवा निमित्त त्याना स्नेह-भोजन देण्यात आले. हॉटेल अरे वा, माता मंदिर चौक ते बजरंग चौक येथे ३१ फुटी गुढी पर्यंत कुलस्वामिनी प्रतिष्ठान व सिडको हडको नववर्ष समिती यांचे सयुंक्त विद्यमाने शोभा यात्रा काढण्यात आली.

शोभा यात्रा विशेष- दोन सजवलेली घोडे ज्यावर सौ पल्लवी कोरडे नववार घालून आपल्या १ वर्षीय रेवा मुली सह होती. तसेच भालदार चोपदार, व सर्व महिला महाराष्ट्र पारंपारिक वेष मधे होती.

चार चाकी चित्ररथ, बैंड बाजा,भालदार चोपदार, अब्दागिरी, ३ फूटी छोट्या १० गुढी, मराठी शुभेच्छा सामाजिक संदेश दहा फलक या सर्वांमुळे शोभायात्रा शोभून दिसत होती.

मा.ना. अतुलजी सावे (कैबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. किशोरजी शितोळे (भा.ज.पा. शहर अध्यक्ष), मा.अनिलजी मकरिये (मनपा सभापती, स्थाई समिती) हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

विश्व हिंदु परिषद चे मान्यवर जहागिरदार राजू , उदय कहाळेकर, शिवाजी दहिवाळ उपस्थित होते.

कल्याण गायकवाड, (पंचायत समिती सभापती, व नव निर्वाचित नगरसेवक – माधुरी अदवंत, सुरेखा गायकवाड, दिलीप थोरात, मीनाताई खरात, कीर्ती शिंदे, पगारे ताई, बाळाजी मुंडे, मयुर वंजारी, विश्वनाथ स्वामी, हिवराळे चंद्रकांत, गणेश नावंदर, तसेच मान्यवर नागरिक श्रीनिवास देव, लक्ष्मी गायकवाड, सरिता घोडतुरे, राहुल खरात, नितीन खरात, अरुण राऊत यांचा सर्वांचा सत्कार आयोजक विलास कोरडे, सौ अलका कोरडे, सौ पल्लवी व मंदार कुलकर्णी, सौ माया व किरण कुलकर्णी यांचे मार्फत करण्यात आला.

ताराचंद गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन अविराज कोरडे व संजय राठोड यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रमुनी जायभाय, प्रलाद गायकवाड, अनिल गावंडे, अच्युत कुलकर्णी, ज्ञानेश्वर सागरे, राहुल नावकर शुभम शिरसाट, यांनी मेहनत घेतली.

मा ना अतुलजी सावे, कॅबिनेट मंत्री यांनी त्यांच्या भाषणात कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे विलास कोरडे व सौ अलका कोरडे तसेच मंदार कुलकर्णी परिवार गेली १५ वर्षापासुन निस्वार्थ हिंदु सण गणेश उत्सव, होळी, गुढी पाडवा, दिवाळी तुळशी विवाह, असे वर्षभर सामाजिक व जनजागृती साठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे शहरात एकमेव असे कुटुंब साजरी करतात, त्यांचे खरे कौतुक आहे. प्रत्येक उपक्रम त्यांचा स्तुत्य आहे असे सांगितले.

# ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

आज अक्कलकोट हे भाविकांचे फार मोठे श्रद्धास्थान आहे लाखो भक्त या ठिकाणी दर्शनाचा लाभ घेत असतात तेथे असलेल्या अन्नछत्रात प्रसादाचाही लाभ घेतात अक्कलकोट येथे.......




श्री गुरु मंदिर म्हणजेच बाळाप्पा महाराजांचा मठ. धारवाड जिल्ह्यातील श्रीमंत सराफ बाळप्पा. आपल्या संसाराचा त्याग करून तिसावे वर्षी अक्कलकोटला गुरु शोधार्थ आले. स्वामींनी त्यांना अनुग्रह देऊन आपल्या आत्मलिंग पादुका दिल्या आणि मठ बांधण्याची आज्ञा केली. माझ्या आत्मलिंग पादुका घेऊन त्यावर एखादा उत्तम मठ स्थापन कर आणि वार्षिक उत्सव करत जा असे त्यांना सांगितले त्यानुसार बाळाप्पांनी मठ स्थापन केला तोच बाळप्पा चा मठ म्हणून ओळखला जातो.

अक्कलकोट येथे वटवृक्ष संस्थान मठ आहे . त्याच परिसरात स्वामी समर्थांचे मंदिरे आहे भक्तांचा या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर ओढा आहे या वटवृक्ष खाली स्वामिनी जवळपास १४ वर्षे वर्ष रहिवास होता आजही तेथे येणाऱ्या भाविकास पूजा नैवेद्य अभिषेक तसेच राहण्याची भोजनाची व्यवस्था केली जाते तसेच संस्थानमार्फत प्रवासासाठी खुले आहे या मठात श्रीच्या जागृत पादुका असून गुरुपौर्णिमा दत्त जयंती स्वामी पुण्यतिथी आदी उत्सव संपन्न होतात.

स्वामींनी यांच्या घरी बरीच वर्षे वास्तव्य केले त्या भक्त चोळपाच्या इच्छेनुसार श्रींची समाधी या मठात आहे चोळप्पाच्या घराजवळ समाधी मंदिर असून त्यात स्वामींनी दिलेल्या पादुका आहेत.

जोशीबाचा मठ, शंकरराव राजेरायन यांचा मठ, महाराजांच्या चर्मपादूका, हाक्याचा मारुती, जंगम यांचे शिव मंदिर, मुरलीधर मंदिर, दर्गा, मालवणी मालोजीरांचा किल्ला, शिवपुरी, आदी ठिकाणे भेट देण्यासारखे आहेत.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी अग्निहोत्र कसे करावे? अग्निहोत्र म्हणजे काय इत्यादी महत्त्वाची माहिती शिवपुरी येथे सांगतात त्यासाठी सूर्यास्ताच्या आधी साधारणपणे एक तास पोहोचावे लागते तसेच श्री महारुद्र रावांची समाधी चोळप्पा महाराज वाड्यातील श्री महाराजांच्या समाधी मठासमोर आहे. याच महारुद्रांना वचन दिल्याप्रमाणे केज येथे त्यांच्या घरी जाऊन सगुण दर्शन दिले आणि म्हणूनच हम गया नही जिंदा है या वचनाची साक्ष पटते .आजही त्यांच्या मार्फत मठात सेवा सुरू आहे.

आज महाराष्ट्रात बहुतेक जिल्हा तालुक्याच्या ठिकाणी तसेच अगदी ग्रामीण भागातही स्वामी समर्थांची मंदिरे तसेच पुणे,नासिक, जळगाव ,मुंबई आदी ठिकाणी स्वामी समर्थांचे मठ आहेत आणि त्या ठिकाणी दररोज उपासना सुरू असते. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ हा जप सुरू असतो. स्वामी समर्थांच्या पोथीचे वाचन, पारायण सुरु असते.




काही वर्षांपूर्वी आम्ही अक्कलकोट ला गेलो होतो, तेव्हा वटवृक्ष मंदिरात मंदिराच्या समोरच व वटवृक्षा जवळची एक नंबर ची खोली आम्हाला रहिवासाला मिळाली होती.

त्यानंतरही दोनतीन वेळी अक्कलकोट जाणे झाले.

आता अक्कलकोट ला मंदिराच्या व्यवस्थेत खूप सुधारणा झालेली आहे.बदल झाला आहे. भाविकांचा ओघही वाढलेला आहे. संस्थानाच्या व्यतिरिक्त बाहेरही रहिवासाची उत्तम सोय झालेली आहे.

परंतू मंदिराच्या परिसरात राहाण्याचा मनसोक्त आनंद आम्हाला मिळाला.तसेच अन्नछत्रात प्रसादाचा लाभ मिळाला होता.

आजही अक्कलकोट येथे दररोज हज्जारोच्या संख्येने भाविक प्रसादाचा लाभ घेत असतात.

।। श्री स्वामी समर्थ.।।




## श्री. गिरीश खंडेराव वसेकर (देशपांडे)

जन्मतारीख : २०.१०.१९६७
जन्मस्थान : औरंगाबाद मूळ गाव : परभणी
शिक्षण: बी. ए. आणि केंद्र शासकीय सेवेत लेखाधिकारी परीक्षा उत्तीर्ण.
व्यवसाय : ऐच्छिक सेवानिवृत्त लेखाधिकारी पुणे बी एस एन एल. विविध सामाजिक कामात सक्रिय असलेले श्री गिरीश खं. वसेकर यांनी आपल्या ३३ वर्षाच्या केंद्र शासनाच्या सेवेत नांदेड, परभणी, छ. संभाजीनगर, पुणे येथे यशस्वीरित्या कार्य केले.
परभणीला असताना १९९८ दूरसंचार विभागात उत्कृष्ट सेवेबद्दल संचार सारथी पुरस्कार प्राप्त. त्यावेळी ५००० रुपये आणि सुवर्णपदकाचे मानकरी ठरले.
शालेय, कॉलेज आणि केंद्र शासकीय सेवेत असताना बुद्धिबळ, कविता,वादविवाद, एकपात्री अभिनय यात अनेक पुरस्कार मिळवले आहेत.
जानेवारी २०२० मधे सेवेतील सेवानिवृत्ती स्कीममधे पुणे बीएसएनएल मधून सेवानिवृत्ती घेतली आणि आता पुणे येथे स्थायिक.
कोरोना काळात ५०० पेक्षा जास्त कविता आणि विविध विषयावर लेखन केले आहे. शीघ्रकवी म्हणून विशेष लोकप्रियता.
पुणे येथे अधून मधुन लहान मुलांसाठी दैनिक लोकमत मधे लेखन, महाराष्ट्र टाइम्स पुणे मधे विविध विषयावर लेखन, तसेच नागपूर सकाळ, जनमंगल साप्ताहिक पुणे, साहित्य मंजिरी साप्ताहिक पुणे, ज्योतिर्मय साहित्य पुणे मधून लेख आणि कविता असतात. तसेच विविध दिवाळी अंकात वेगवेगळ्या विषयावर लेख प्रकाशित होत असतात.

♦ प्रकाशित काव्यसंग्रह :
१) चाफा २०२३ (जुलै) मध्ये वल्लरी प्रकाशन पुणे कडून प्रकाशित (प्रातिनिधिक)
२) आमोद २०२४ (ऑगस्ट) हा प्रातिनिधिक काव्य संग्रह, अविरत पब्लिकेशन नांदेड येथून प्रकाशित (प्रातिनिधिक)

♦ विशेष सन्मान
१) लोकमत पुणेचा (उत्कृष्ट साहित्यिक म्हणुन) लोकमत अचिव्हमेंट अवॉर्ड 2023 साठी निवड आणि ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री श्री मोहन आगाशे यांच्या हस्ते सन्मानित,
२) नांदेड सिटी पुणे येथील उत्कृष्ट साहित्यिक म्हणून पद्मश्री डॉ तात्याराव लहाने यांच्याकडून सन्मानित.
३) फुलोरा, साहित्य समूह संगमनेर कडून उत्कृष्ट कवी म्हणुन सन्मानित
4) शुभंकरोती साहित्य समूह मुंबई कडून उत्कृष्ट साहित्यक म्हणुन सन्मानित.
5) तितीक्षा आंतराष्ट्रीय साहित्य समूह पुणे कडून उत्कृष्ट कवी म्हणुन सन्मानित.
६) तितीक्षा आंतरराष्ट्रीय पुणे कडून पुस्तक दिना निमित्त कोल्हापूर येथे लोकप्रिय अभिनेते श्री स्वनिल राजशेखर यांच्या कडून उत्कृष्ट काव्यलेखनासाठी काव्य करंडक व प्रमाणपत्रा सहित जून २०२६ मध्ये सन्मानित.
नुकताच तितिक्षा इंटरनेशनल पुण्याचा मातृगौरव पुरस्कार ही प्राप्त झाला आहे.

♦ तसेच श्री गिरीश वसेकर यांचा किशोर लेख संग्रह, पापा (पालक व पाल्यांसाठी) व टांग टिंग टिंगा हा बालकाव्य संग्रह ही २०२५ मध्ये दिवाळी दरम्यान, ज्योतिर्मय प्रकाशन पुणे / संभाजी नगर यांच्या मार्फत प्रकाशित झाला आहे.

पत्ता : श्री गिरीश खं.वसेकर,
नांदेड सिटी, पुणे
भ्रमणध्वनी : ९४२२६५९४००
इमेल: gkvasekar@ gmail.com

डॉ. दुधभाते नेत्रालय
आणि रेटिना सेंटर
तर्फे
सर्व लाडक्या बहिणींसाठी
मोफत नेत्र लॅसिक तपासणी
स्पष्ट दृष्टी...
चष्मापासून मुक्ती...
कालावधी
०१ मार्च ते ३१ मार्च २०२६
नोंदणीसाठी संपर्क
माणिक बाग, सिंहगड रोड, पुणे | 020- 24351535 / 74980 79406


Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

♦ स्टेप अप एस आय पी...(SIP) ♦

चला तुम्ही SIP तर केलीत.
पण दर वर्षी तुमचा पगार वाढणार आहे, व्यवसाय असेल तर उत्पन्न वाढणार आहे...वाढत्या अनुभवा प्रमाणे पगार, उत्पन्न हे वाढत जाते.
उत्पन्न वाढले की आपण आपल्या गरजा त्या अनुषंगाने वाढवतो.
आधी मी ऑपरेटर म्हणून कामाला सुरुवात केली तेव्हा सायकल वर कंपनी मध्ये जात असे,मग मी सुपरवायझर झालो मग दुचाकी वरून कंपनी मध्ये जाऊ लागलो, आणि मॅनेजर झालो तसा मी कारने कंपनी मध्ये जाऊ लागलो....हे जसे स्थित्यंतर आपोआप होत असते तसेच बचत किंवा इनव्हेस्टमेंट मधेही व्हायला हवे....होय ना?
पण प्रत्यक्षात मात्र तसं होत नाही....
उत्पन्न वाढलं तसं बचत, इनव्हेस्टमेंट सुद्धा वाढवायलाच हवी.
या साठी म्युच्युअल फंड मात्र SIP मधे स्टेप अप ची सुविधा देतात.
स्टेप अप म्हणजे SIP मधे दर वर्षी आपोआप होणारी वाढ.
ही वाढ तुमच्या सोयीने होत राहते.
म्हणजे तुम्ही SIP मधे किती टक्के रक्कम वाढवायची हे ठरवायचे तशी सुचना द्यायची तुमची SIP दरवर्षी तेवढ्या टक्क्यांनी वाढत जाते.
अशी SIP करणे फायदेशीर ठरते.
आपल्याला नियमित बचत करण्याची आणि ती वाढत्या उत्पन्ना बरोबर वाढवण्याची चांगली सवय ,शिस्त लागते.
आपण ज्या ध्येया साठी (Goal) बचत, इनव्हेस्टमेंट करत होतो ते लवकर आणि वेळेच्या आधी पूर्ण होते.
उदाहरणार्थ,समजा तुम्ही वयाच्या साठाव्या वर्षी पेन्शन साठी एक कोटी रुपयांची रक्कम जमा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे आणि त्या साठी दरमहा दहा हजार रुपयांची SIP केली आहे.
हीच SIP स्टेप अप केल्याने तुमचा रीटायरमेंट चा गोल तुम्ही लवकर म्हणजे ५० ते ५५ व्या वर्षीच पुर्ण करु शकता...
पुढच्या वेळी SIP करताना ती स्टेप अप करायला विसरू नका.




## ♦ "मी"ला "आम्ही "मधे परावर्तित करा

आपल्या दररोजच्या जीवनात बोलताना अनेक शब्द जोडीने येतात, जसे खरे-खोटे, पाप-पुण्य, लहान-मोठा, सुख-दुःख, गरिब-श्रीमंत या दोन्हीचा समतोल साधा. तसेच जे दोन शब्द आपण वापरतो व त्याचा आपल्या सुखदुःखाचे तरंगासी संबंध येतो, व विशेष म्हणजे ते शब्द आपल्या घरात, कुटुंबात निगडीत आहेत. व ते आपण दर तासाला वापरतोच वापरतो. ते शब्द म्हणजे "मी" व "आम्ही "! जशी सुख-दुःखात जशी स्पर्धा आहे, तशी मला या दोन शब्दात दिसली, जाणीव झाली, किंवा अनुभूती झाली असे म्हणू या.. कारण त्यामुळे
वाद-भांडणे होऊन या "तरंगाला" खाद्य मिळते, असा माझा ठाम समज आहे, येथे अर्थात प्रत्येकाचे विचार वेगळे असतील. मी म्हणजे मीच करू शकतो, मीच करेन, मी नसेल तर काहीच होणार
नाही.. तर दुसरीकडे आम्ही म्हणजे सर्वांना सोबत घेऊन चला. सर्व मिळून करू या. अर्थात समाजात, कुटुंबात या अनेक मी ला शोधून त्या सर्वांचा "आपण" बनवा.. समजलं ना. पटत का कारण आपल्यावर एक सर्वोच्च शक्ती किंवा देव म्हणा, पण तो तिथे आहे. जसे मोठ्या खडकातून फूटल्यावर त्यामधे एक जिवंत किडा बाहेर येतो.. म्हणजे दगडाच्या आतही कीडा जगू शकतो. त्याला कोण जिवंत ठेवतो? म्हणजे हे आपल्या हातात नाही.. म्हणून मी पणा अहंकार गेला की, आम्ही-
आपण निर्माण होईल, ईतके हे सोप आहे.. व हे सुख-दुःखाचे तरंग सुसह्य होतील.
गुड मार्निग.. टेक केअर.. बी हॅपी..

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ





ऑनलाईन औषधोपचार
आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# ज्ञानाची मुळं निसर्गातच

**ज्योतिर्मय साहित्य**

कधी कधी आयुष्याच्या धावपळीत अचानक एखादी जुनी आठवण मनाच्या दारावर हलकेच टकटक करते आणि आपण क्षणात बालपणाच्या त्या निरागस वाटेवर जाऊन पोहोचतो. ते दिवस किती छान होते! ते मोकळं आकाश, ते हिरवं रान आणि एखाद्या डेरेदार झाडाच्या सावलीत बसून केलेला अभ्यास. आजही त्या आठवणी मनाला अलगद स्पर्श करतात. त्या साध्या क्षणांत जो विलक्षण आनंद दडलेला होता, तो आजच्या या गजबजलेल्या आयुष्यात क्वचितच अनुभवायला मिळतो.

त्या काळी अभ्यासासाठी वेगळी खोली, टेबल-खुर्ची किंवा खास व्यवस्था नव्हती. आमचं अभ्यासाचं ठिकाण म्हणजे रानात उभं असलेलं एखादं पुरातन दाट सावलीचं झाड. त्या झाडाखाली बसलं की जणू निसर्गानेच आमच्यासाठी एक शांत, प्रसन्न शाळा उभारली आहे असं वाटायचं. फांद्यांच्या जाळीतून झिरपणारे सूर्यकिरण जमिनीवर पडायचे आणि त्या प्रकाशात उघडलेलं पुस्तक जणू नव्या तेजाने उजळून निघायचं.



आजूबाजूला पसरलेलं हिरवं रान, मातीचा मंद सुवास आणि दूरवरून ऐकू येणारा पक्ष्यांचा गोड किलबिलाट अशा सुरेल वातावरणात अभ्यास नकळत रंगून जायचा. कधी एखादी हलकी वाऱ्याची झुळूक यायची आणि पुस्तकाची पानं हलकेच उलटायची. त्या क्षणी वाटायचं, जणू निसर्ग स्वतः आपल्याला काही सांगतो आहे, काही शिकवतो आहे. त्या शांत वातावरणात धडा फक्त वाचला जात नव्हता, तर तो अनुभवला जात होता.

कधी पुस्तकातून नजर वर गेली की समोर अथांग, स्वच्छ निळं आकाश दिसायचं. त्या आकाशाकडे पाहताना मनात नकळत स्वप्नांची लहानशी पाखरं उडू लागायची. त्या वयात फारसं कळत नव्हतं, पण त्या साध्या क्षणांतच आयुष्याच्या मोठ्या स्वप्नांची बीजं मनात रुजत होती. कधी एखादं छोटंसं पाखरू जवळच्या फांदीवर येऊन बसायचं, तर कधी एखादं रंगीत फुलपाखरू डोळ्यासमोरून अलगद उडून जायचं. त्या क्षणांत एक निरागस आनंद दडलेला असायचा.

त्या वातावरणात अभ्यासाचा ताण नव्हता. शांततेत मन अधिक स्थिर व्हायचं. पुस्तकातील अक्षरं जणू त्या निसर्गाच्या साक्षीने अधिक जिवंत वाटायची. वेळ कसा सरत होता, हेही कळत नसे. हळूहळू सूर्य मावळतीकडे झुकायचा, झाडांच्या सावल्या लांब पसरायच्या आणि मग घराकडून एखादी ओळखीची हाक कानावर यायची - ''पुरे आता घरी या!'' तेव्हा कुठे भान यायचं की परतायची वेळ झाली आहे.

त्या दिवसांत साधनं कमी होती, पण मनात प्रचंड उमेद होती, जिद्द होती आणि स्वप्नांची उब होती. झाडाखाली बसून केलेला तो अभ्यास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित नव्हता. त्या क्षणांनी आम्हाला साधेपणातलं सौंदर्य दाखवलं, कष्टाची गोडी शिकवली आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे निसर्गाशी एक अतूट नातं जोडायला शिकवलं.

आज काळ बदलला आहे. अभ्यासासाठी आधुनिक साधनं, तंत्रज्ञान आणि असंख्य सुविधा उपलब्ध आहेत. पण त्या झाडाच्या सावलीत बसून केलेल्या अभ्यासाची गोडी काही वेगळीच होती. त्या सावलीत शांतता होती, समाधान होतं आणि मनात निर्मळ आनंदही होता.

आजही एखादं जुनं झाड दिसलं की पाय नकळत थांबतात. त्या सावलीत क्षणभर विसावलं की आठवणींची पानं अलगद उलगडू लागतात आणि मनात एक हळवा विचार उमटतो - पुढच्या पिढीलाही अशा साध्या, सुंदर क्षणांचा अनुभव मिळायला हवा. पुस्तकांसोबत थोडा वेळ निसर्गाच्या सान्निध्यात घालवायला हवा, झाडांशी मैत्री करायला हवी आणि मातीचा सुगंध मनभर अनुभवायला हवा. कारण ज्ञान हे केवळ पुस्तकांतच नसतं; ते निसर्गाच्या प्रत्येक श्वासात अलगद दडलेलं असतं.



मंगेश दौंडकर,
पुणे, मो.- 9890619354

# ''कवितेच्या हिंदोळ्यावर'' मराठी कवितांच्या अभिवाचन मैफलीचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**




छत्रपती संभाजीनगर : ध्यास गझल समूह, टेरेसवरील कविता परिवारातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास कवयित्रींचा राज्यभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. ह्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ, रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी, जीवन विकास ग्रंथालयाचे ग्रंथमित्र भा.बा. आर्वीकर सभागृह येथे संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत संपन्न होणार आहे. यासोबतच ''कवितेच्या हिंदोळ्यावर'' ही दर्जेदार मराठी कवितांची अभिवाचन मैफल रंगणार आहे. ह्यात आघाडीच्या कवयित्री अंजली दीक्षित, कल्याणी कोळपकर, कस्तुरी कुलकर्णी, मृणाल देशपांडे, रूपाली पाटील, संध्या फुलपगार कवितांचे अभिवाचन करणार आहेत. कु.अबोली झोळगीकर कविता /गीतांचे गायन करणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ बालसाहित्यिक प्रा.लीला शिंदे असणार आहेत. तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री रसिका देशमुख, प्रिया धारूरकर, अमिता पैठणकर उपस्थित असतील. सदरील कार्यक्रम मोफत असून कविता रसिकांनी कार्यक्रमास यावे असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक गिरीश जोशी, मृणाल देशपांडे ह्यांनी केले आहे.

# सर्वशाखीय ब्राह्मण समाजाचा २९ ता. च्या राज्यस्तरीय वधू-वर मेळावासाठी नोंदणीचे आवाहन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : कण्व ब्राह्मण समाजाच्या वतीने १८ व्या राज्यस्तरीय सर्वशाखीय ब्राह्मण समाजाच्या वधू-वर मेळाव्याचे आयोजन रवी दि २९ मार्च रोजी सकाळी १०.३० वा. कण्व भवन, कलावती शाळेच्या बाजूला, छ.संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात उपवर मुली व जास्तीतजास्त प्रमाणात उपस्थित राहण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

संस्था हा मेळावा गेल्या १८ वर्षांपासून घेत असून आतापर्यंत अशा मेळाव्याद्वारे १२०० विवाह जुळले आहेत. मुलामुलींच्या नोंदणीसाठी ९८२२७६४३९९ /९९२३१४११७१ वर किंवा कण्व भवन, कलावती शाळेच्या बाजूला, शिवाजीनगर येथे नोंदणी करण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने अध्यक्ष सीएस लक्ष्मीकांत जयपूरकर, मेळावा समिती अध्यक्ष अशोक भाले यांनी केले असून मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी उदय मानवतकर, धीरज देशपांडे, सौ विजयालक्ष्मी भाले-कुलकर्णी, प्रफुल्ल कुलकर्णी, धनंजय सिमन्त, सौ अलका भाले, सौ संगीता कागबट्टे, सुरेंद्र आनंदगावकर, महेंद्र मानवतकर, सौ सविता आचार्य, तुळशीदास जयपुरकर, सौ ज्योती कुलकर्णी, भालचंद्र पिंपळवाडकर व अनिल दिन्नापुरकर, प्रमोद कुलकर्णी, दीपक खळेगावकर, रमेश परळीकर व अॅड सुरेश कुलकर्णी प्रयत्न करत आहेत.




# दुःखी , ना.धों.महानोर राज्य पुरस्कारांचे थाटात वितरण

**ज्योतिर्मय साहित्य**

जालना - १९ मार्च १९८६ ला पहिली शेतकऱ्याची आत्महत्या झाली होती. १९९६ ते २०२२ या काळात ९६ हजार २४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. दरवर्षी सरासरी दोन शेतकरी आत्महत्या करत आहेत. समाज स्वास्थ्यासाठी हा कलंक असून आज खंडीभर काव्य लिहिलं जातंय प्रेयसी, चांदणी तीच गाणी केव्हापर्यंत लिहिणार ?,प्राध्यापक कुटुंबा पुरते जगतात. राजकारणी पुढच्या पिढ्यांसाठी इतरांची पाय कापत आहेत. वेदनेला जात नसते. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या पाठीशी कवी, साहित्यिकांनी उभ राहण गरजेच आहे. असे परखड मत ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

''दु:खी'' राज्य काव्य आणि ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्कारांचे वितरण गुरुवारी ( ता.१९) सायंकाळी जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित ''कवितेचा पाडवा'' या कार्यक्रमात विश्वास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.प्रसिद्ध उर्दु शायर राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा ''दु:खी'' राज्य काव्य पुरस्कार कवी अशोक नायगावकर (रोख २५ हजार रूपये) यांना तर ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्कार (रोख १० हजार रूपये) ,ज्येष्ठ ललित लेखिका डॉ .मीनाक्षी पाटील यांना प्रदान करण्यात आला. यावेळी अभय साहनी,विनीत साहनी, डॉ. संजीवनी तडेगावकर, पंडितराव तडेगावकर,डॉ. चिरागसिंग बिलवान यांची प्रमुख उपस्थिती होती.

विश्वास पाटील याप्रसंगी म्हणाले, कवी हा शब्दसृष्टीचा जादूगार असतो. जटिल प्रश्न, समस्या समजून घेतात. शब्दांच्या इज्जतीसाठी स्वातंत्र्यानंतर एका कवीने तुरुंगवास भोगला असे त्यांनी सांगितले. सत्कारास उत्तर देतांना डॉ .मीनाक्षी पाटील यांनी बालपणापासून ते आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारांचा आनंद, जगण्याची धडपड आणि समाधान व्यक्त करत पुरस्काराची रक्कम धुळे येथील वि.का.राजवाडे संस्थेस देण्याची घोषणा त्यांनी केली.कवी, लेखक, कलावंत कृतीतून भूमिका घेत असतात . संघर्ष हा जगण्याचा स्थायी भाव असून कमी अधिक तीव्र असतो. आपल जगण हीच कविता असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ.संजीवनी तडेगावकर यांनी पुरस्कार प्राप्त कवी, लेखकांचा परिचय देत माणसांना उगवून येण्यासाठी सुरू असलेल्या कवितेच्या पाडव्याची वाटचाल विषद केली. विनीत साहनी यांनी स्वागतपर मनोगतात रसिकांची शक्ती,दाद आम्हाला बळ देते. सध्या युध्दाची धग कोणी विझवू शकेल पण कवितेतून लागणारी आग विझविण्याची हिंमत कोणात नाही असे सांगितले. निवेदन कवी धम्मपाल जाधव यांनी केले तर पंडितराव तडेगावकर यांनी आभार मानले. चित्रकार श्रीधर अंभोरे, छायाचित्रकार ज्ञानेश्वर गिराम, राहुल चक्रे, राजेंद्र पाटील यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# सौ. निर्मला भयवाळ यांना स्त्री शक्ती सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**



जागतिक महिलादिनानिमित्त नेपाळ येथील ''शब्द प्रतिभा बहुक्षेत्रीय सम्मान फाउंडेशन'' या संस्थेकडून यंदाच्या जागतिक महिला दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील कवयित्री तथा लेखिका सौ. निर्मला भयवाळ यांना ''स्त्री शक्ती सन्मान'' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मानाबद्दल समाजातील सर्व स्तरातून सौ. निर्मला भयवाळ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सौ. भयवाळ यांचे दोन कविता संग्रह प्रकाशित झालेले असून आजपावेतो राज्य स्तरावरील अनेक सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

# महाराष्ट्र-ओरिसा राज्यातील लोककला सादरीकरणाने लोकोत्सवाचा समारोप

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे हमारा भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत तापडिया रंगमंदिरात १६ ते १८ मार्च असे तीन दिवस आदिवासी लोककला महोत्सवाचा समारोप ओरिसामधील पंचरस व महाराष्ट्रातील गंध मराठी मातीचा या दिमाखदार कार्यक्रमांनी झाला.

बुधवार, १८ मार्च रोजी रात्री आरती क्रिएशन प्रस्तुत गंध मराठी मातीचा या कार्यक्रमात पारंपरिक नमन, गणेश वंदना, लेझीम नृत्य, जात्यावरची ओवी, वासुदेव, पारंपरिक गवळण, देवीचा गोंधळ, खंडोबाचे जागरण, कोळीगीत, लोकगीत, शेतकरी गीत, लावणी, जोगवा आदी कलाप्रकार सादर झाले. ओरिसा राज्यातील पारंपरिक आदिवासी लोककलावंतांनी घुडका, डालमाई आणि पंचरस असे ३ कार्यक्रम सादर करून रसिकांची मने जिंकली.

आरती पाटणकर प्रस्तुत गंध मराठी मातीचा पारंपरिक नमनाने प्रारंभ झाला. त्यानंतर गणेश वंदना, पारंपरिक लेझीम नृत्य, पहिली माझी ओवी गं अशा जात्यावरच्या ओव्या, गाव जागविता आली वासुदेवाची स्वारी हे गीत, बाई माझ्या ग दुधात नाही पाणी ही पारंपरिक गवळण, आई जगदंबेचा गोंधळ, जागरण गीत, नवरी नटली हे पारंपारिक लोकगीत, मी हाय कोली, चल जाऊ बाजारला, वल्लव रे नाखवा, आम्ही जातीचे शेतकरी हे गीत, अशी मी मदन मंजिरी, सुबक ठेंगणी चटक चांदणी, लुकलुकते अंबरी ही लावणी, लल्लाटी भंडार हा सुप्रसिद्ध जोगवा अशी एकाहून एक सरस मराठमोळी गाणी सादर झाली.

**ओरिसाचा लोकाविष्कार**

ओरिसातील बलांगिर जिल्ह्यातील सबर जातीच्या आदिवासी लोककलावंतानी पारंपरिक संबल्पुरी, भजन, डालखाई नृत्य, घुडका नृत्य सादर केले. त्यासाठी पारंपारिक नगारा, ढोल, ढोलक, ताशा, झांज आणि बासरी या वाद्याच्या तालावर संगीताचा नजराणा पेश केला. ओरिसा राज्यातील आदिवासी लोककलावंतांची पारंपरिक वेशभूषा, रंगभूषा, नृत्य, गायन आणि वादनाने तापडिया नाट्यगृहातील परिसर दणाणून गेला. समारोपप्रसंगी ओरिसातील पारंपरिक लोककलावंतांच्या नृत्य, नाट्यसंगीतावर प्रेक्षकांनी चांगलाच ठेका धरला. खान्देशातील साक्री येथील आदिवासी, कोकणी लोककलावंतानी पावरी नृत्य व नंदी नृत्य सादर करत विविध कसरतींचे दर्शन घडविले.

सोमवारी सायंकाळी डॉ. जयंत शेवतेकर आणि कलावंत दिलीप खंडेराय यांच्या हस्ते लोकोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यानंतर प्रसिद्ध भारूड कलावंत हमीद सय्यद आणि सहकाऱ्यांनी संत एकनाथांचे सोंगी भारुड सादर केले. यावेळी लोककला अभ्यासक भगवान राऊत, छत्रपती संभाजी नगर येथील लोककला अभ्यासक शाहीर डॉ. शेषराव पठाडे, ज्येष्ठ पत्रकार मधुकरअण्णा वैद्य, सुजित ताजने यांच्यासह अनेक मान्यवर व रसिक प्रेक्षक उपस्थित होते. शाहीर प्रवीण जाधव यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले. शाहीर प्रताप जाधव यांनी आभार मानले.

# केदार शिंदे - सना शिंदे घेऊन येत आहेत 'आई भाड्याने हवी?'

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी चित्रपटसृष्टीत स्त्रीप्रधान आणि कुटुंबप्रधान विषयांना वेगळी ओळख देणारे दिग्दर्शक केदार यशोधरा शिंदे आता आणखी एका वेगळ्या आणि विचार करायला लावणाऱ्या संकल्पनेसह प्रेक्षकांसमोर येत आहेत. 'अगंबाईअरेच्चा!', 'बाईपण भारी देवा' आणि 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' या यशस्वी चित्रपटांनंतर आता 'आई भाड्याने हवी?' या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे.


सनफ्लॉवर स्टुडिओ निर्मित या चित्रपटाची कथा आणि लेखन वैशाली शशी नाईक आणि ओंकार वसुंधरा दत्त यांनी केले असून छायांकन व संकलनाची जबाबदारी मयुर संजिवनी हरदास यांनी सांभाळली आहे. विशेष म्हणजे 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?'नंतर निर्माती सना शिंदे, दिग्दर्शक केदार शिंदे, लेखिका वैशाली शशी नाईक, लेखक ओंकार वसुंधरा दत्त ही चौकडी पुन्हा एकदा एकत्र येत असल्याने चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे.




दिग्दर्शक केदार शिंदे सांगतात, ''स्त्रीप्रधान विषय हाताळणे ही नेहमीच जबाबदारीची आणि आव्हानात्मक गोष्ट असते. जोपर्यंत एखादी कथा मनापासून भिडत नाही, तोपर्यंत अशा चित्रपटाची सुरुवात करायची नाही, असा माझा ठाम निर्धार होता. 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' आणि 'आई भाड्याने हवी?' या दोन्ही चित्रपटांचे काम २०२३ पासून सुरू झाले. 'आई भाड्याने हवी?' हा चित्रपट मी ज्यांना आदर्श मानतो त्या राजकुमार हिरानी यांच्या शैलीची झलक देणारा आहे. हा केवळ विनोदी चित्रपट नाही, तर 'आई' या नात्याचा गाभा मांडणारा, मनाला स्पर्श करून जाणारा अनुभव आहे. मनोरंजनासोबतच विचार करायला लावणं हे माझं ध्येय असतं आणि या चित्रपटात ते प्रकर्षाने जाणवेल. शीर्षकातूनच आजच्या काळातील भावनिक तगमग जाणवते. सध्या कलाकारांची निवड सुरू असून, विविध वयोगटातील 'आई' प्रेक्षकांना पाहायला मिळतील. जून-जुलैमध्ये चित्रीकरणाला सुरुवात होईल.''

निर्माती सना शिंदे म्हणतात, ''पहिल्या चित्रपटाला प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमामुळे या नव्या चित्रपटाबद्दलही तितकीच उत्सुकता आहे. पहिला चित्रपट भावनिक अंगाने साकारण्यात आला होता, तर 'आई भाड्याने हवी?' हा पूर्णपणे मनोरंजनप्रधान, रंगतदार आणि मल्टीस्टारर आहे. यात नातेसंबंध, भावना आणि विनोद यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळेल. मला वैयक्तिकरित्या स्त्रीकेंद्री कथा आवडतात, त्यात 'आई' ही प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात सक्षम आणि प्रभावी व्यक्तिरेखा असते. प्रेक्षकांना आशयघन आणि मनाला भिडणारे चित्रपट देण्याचा आमचा प्रयत्न कायम असतो, आणि हा चित्रपट त्याच दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे.''

'आई भाड्याने हवी?' या वेगळ्या शीर्षकातूनच प्रेक्षकांच्या मनात कुतूहल निर्माण होत आहे. आजच्या बदलत्या कुटुंबव्यवस्थेत 'आई' या नात्याची गरज, त्याची उणीव आणि त्यामागची भावनिक पोकळी यावर हा चित्रपट हलक्याफुलक्या तरीही परिणामकारक पद्धतीने भाष्य करणार असल्याचे दिसते. एकीकडे धमाल, हसवणूक आणि मनोरंजन, तर दुसरीकडे अंतर्मुख करणारा आशय या दुहेरी ताकदीमुळे 'आई भाड्याने हवी?' हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक वेगळाच अनुभव ठरणार, यात शंका नाही. आता या 'आई'च्या शोधाची कथा नेमकी कशी उलगडते, हे पाहाणे उत्सुकतेचे ठरणार आहे.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559